# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:14.03.2025** **वार : शुक्रवार**

---

ठळक बातम्या

- आशय निर्मितीच्या क्षेत्रात भारत क्रांती घडवत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांचं प्रतिपादन.
- आशय निर्मिती करणाऱ्यांसाठी 1 अब्ज डॉलरचा निधी उभारण्याची केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांची घोषणा.
- Indian Institute of Creative Technologyची पहिली शाखा मुंबईत गोरेगाव चित्रनगरीत उभारणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

आणि

- राज्यात सर्वत्र होळीचा सण उत्साहात साजरा; आज ठिकठिकाणी धुळवडीचा जल्लोष.

**वेव्ज**

अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि परंपरा यांच्या एकत्रीकरणातून, भारत, आशय निर्मितीच्या क्षेत्रात क्रांती घडवत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी काल सांगितलं. मुंबईत येत्या मे महिन्यात होणाऱ्या वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडियो व्हिज्यूअल ॲण्ड एंटरटेनमेंट परिषदेच्या पार्श्वभूमीवर काल नवी दिल्लीत जागतिक समुदायासाठी एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. यावेळी केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्यात 'वेव्हज 2025' निमित्त सामंजस्य करार झाला. विविध प्रकारची आशय निर्मिती करणाऱ्यांसाठी १ अब्ज डॉलरचा निधी उभारण्याची घोषणा अश्विनी वैष्णव यांनी यावेळी केली. तसंच आयआयटी, आयआयएमच्या धर्तीवर भारतीय आशय तंत्रज्ञान संस्था; Indian Institute of Creative Technology ची स्थापना केली जाईल आणि याची पहिली शाखा मुंबईत सुरू करण्यात येईल अशी घोषणा वैष्णव यांनी केली. ते म्हणाले... . . . .

**क्रिएटर इकोनोमी के लिये 1 बिलियन डॉलर का फंड क्रिएट किया जायेगा , जो के ये इस वेव्हज को आगे ले जाने के लिये हो.**

जागतिक स्तरावर होणा-या या पहिल्या परिषदेचं यजमानपद महाराष्ट्राला मिळालं, ही अभिमानाची बाब असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. वेव्ज परिषदेसाठी मुंबई सज्ज असल्याचं सांगून ते म्हणाले – **ओर ये जो दुनिया का सबसे बडा व्यासपीठ तयार हो रहा है हम तो ये निवेदन भारत सरकार से करणे वाले है , के ये व्यासपीठ आनेवाले दिनो में प्रॉपर्टी के रूप में हमेशा मुंबई में ही आयोजित कि जाये . में महाराष्ट्र सरकार की ओर से भारत सरकार को ये आश्वस्त करता हु के इस की सफलता में हम कोई कसर नाही छोडेंगे एक ग्लोबल ब्रांड तयार हो रहा है जिसका देश को ओर मुंबई को बहोत फायदा होगा .**

या कार्यक्रमानंतर फडणवीस यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींना अधिक माहिती दिली - आयआयसीटी ही संस्था मुंबईच्या गोरेगाव चित्रनगरीमध्ये उभारण्यात येईल असं त्यांनी सांगितलं. -----

**एक प्रचंड मोठी संधी मुंबई आणि महाराष्ट्राला याच्या मुळे मिळालेली आहे, आज आपल्याला माहित आहे कि क्रिएटिव्ह इकोनॉमी ही सगळ्यात वेगाने वाढणारी इकोनॉमी आहे आणि लवकरच भारत पन्नास बिलियन डॉलरची इकोनॉमी तयार करतोय आणि म्हणूनच हा जगातला सर्वात मोठा इव्हेंट हा आपल्याला मिळणं , ही देखील मला असं वाटत महत्वाची गोष्ट आहे, त्यातच मी पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव जी यांचे मनापासून आभार मानतो की महाराष्ट्राला त्यांनी या साठी निवडलं यासाठी भारत सरकार ने II T जशी आहे तशी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नोलॉजी तयार करण्याचा निर्णय घेतलाय आणि त्यातलं पहिली II T IICT ही मुंबई लाच तयार होणार आहे . आपल्या फिल्मसिटी गोरेगाव मध्ये आपण त्याकरता जागा केंद्रित केली आहे. आणि जवळपास 400 कोटी रुपये केंद्र सरकार त्या करता खर्च करत आहेत. त्यामुळे कंटेन क्रिएटर च्या क्षेत्रातलं सगळ्या गोष्टी आपल्याकडे उपलब्ध असतील.**

**होळी धूळवड**

राज्यात सर्वत्र काल होळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा झाला. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी जनतेला होळी आणि धूलिवंदनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय संस्कृतीत सण, उत्सवातून निसर्ग रक्षणाचा मंत्र जपला जातो; हा संदेश घेऊनच आपण पर्यावरणपूरकरित्या सण साजरा करूया. असं आवाहन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राज्यातील नागरिकांना होळी आणि धुलिवंदनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही नागरिकांना होळीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

कोकणात काल शिमगोत्सवाचा उत्साह होता; अनेक गावात स्थानिक दैवतांच्या पालख्या काढण्यात आल्या; तसंच ग्रामदेवतेसमोरच्या पटांगणात होलिकादहन करण्यात आलं. मुंबईत पुण्यासह राज्याच्या विविध भागातही काल अनेक ठिकाणी होलिका दहन करण्यात आलं. 'होळी लहान करा शेणी दान करा' या कोल्हापूर महापालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देत शहर परिसरातील तरुण मंडळ आणि सामाजिक संस्थांनी सामाजिक बांधिलकी जपली. धुळे शहरातील खंडेराव महाराज मंदिरात काल होळीनिमित्त विशेष

महाआरती तसंच फुलांची आणि भंडाऱ्याची उधळण करत भाविकांनी होळी रंगोत्सव साजरा केला. भंडारा जिल्ह्यात लाखांदूर तालुक्यातल्या गवराळा या गावातील नागरिक गेल्या 33 वर्षांपासून रंगाची उधळण न करता हा सण भक्तिरंगात रंगून साजरा करतात. इथं होळीच्या दिवशी कर्मयोगी अनासक्त ब्रह्मलीन किसनबाबा अवसरे पुण्यतिथी महोत्सव तर रंगपंचमीच्या दिवशी गोपालकाला आयोजित केला जातो. गावात आजही लाकडांची होळी पेटत नाही, तर ग्रामस्वच्छता करून गोळा केलेल्या केरकचऱ्याची होळी केली जाते. पंढरपूरमध्ये होळीपासून रंगपंचमीपर्यंतच्या काळात उत्पात समाजाच्या बैठकीच्या लावणीची अनेक वर्षांची परंपरा आजही जपली जाते.

**मढी यात्रा**

भटक्यांच्या पंढरी म्हणून ओळख असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातल्या मढीच्या यात्रेला काल सुरुवात झाली. मंदिराच्या कळसाला नाथांची काठी लावून हा यात्रा उत्सव सुरू होतो.पहिल्या दिवशी कैकाडी समाजाला काठीचा मान असतो त्यानंतर गोपाल समाजालादेखील या काठीचा मान दुसरा आहे. कालच्या होळीच्या सणानंतर आज सर्वत्र धूलिवंदन साजरं होत आहे. राज्यात अनेक ठिकाणी आज रंगोत्सव साजरा केला जातो; हा सण साजरा करताना पर्यावरणपूरक रंग वापरण्याचं आवाहन करण्यात येत आहे. राज्यात अनेक ठिकाणी रंगपंचमीच्या दिवशी देखील रंगोत्सव साजरा केला जातो.

**रोजगार निर्मिती**

सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनानं 2019पासून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना सुरू केली. 2024-25 या आर्थिक वर्षासाठी या योजनेअंतर्गत सांगली जिल्ह्यानं 100 टक्के उद्दिष्ट पूर्ण करून महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवला आहे. सांगली जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक विद्या कुलकर्णी यांनी त्याबाबत अधिक माहिती दिली ..

**ही योजना राबवत असताना आम्ही अगदी पहिल्या पासूनच प्रयत्न करून जवळजवळ हे 3800 अर्ज आम्ही बँकांकडे पाठवले होते. प्रत्येक बँकेत जाऊन त्या त्या लाभार्थ्याला तिथे बोलावून घेऊन समोरासमोर त्याची कुठली कागदपत्र राहिली आहेत आणि त्याची पूर्तता करून जेणेकरून हे मंजूर प्रक्रिया जलद गतीने होईल, तर याप्रमाणे आम्ही प्रत्येक प्रकरणाचा पाठपुरावा केला, आणि याबाबतीत आम्हाला बँकांचे खूप सहकार्य झालं , गेल्या दोन तीन वर्षापेक्षा यावर्षी आमचं टार्गेट लवकर अचिव्ह झालं. पण येत्या मार्च पर्यंत अजून आमची 100 दोनशे प्रकरण वाढतील आणि अशा पद्धतीने साधारणता 900 च्या आसपास उद्योजक त्यांच्या पायावर उभं राहता येईल .**

**पानिपत**

पानिपत इथं राज्य शासनाच्यावतीने मराठा युद्धवीरांचं शौर्य स्मारक उभारलं जाईल, अशी घोषणा मराठा शौर्य दिन कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी केली होती. त्यानुसार काल शासन आदेश जारी करण्यात आला. हरियाणा राज्यातील पानिपत इथल्या 'कालाआम' परिसरात हे स्मारक असेल, या

ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्यात येईल, मराठा शौर्याची गाथा सांगणारं संग्रहालय, दृकश्राव्य सादरीकरणही इथे असेल, अशी माहिती पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी काल दिली. या प्रकल्पाकरता जमीन अधिग्रहित करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास विभाग, मध्यवर्ती यंत्रणा म्हणून काम करणार असून यासंदर्भात हरियाणा राज्य शासनाशी समन्वय साधण्यासाठी आपण स्वत: समन्वयक म्हणून काम करणार आहोत असं रावल म्हणाले.

**दूध दरात वाढ**

येत्या शनिवारपासून राज्यात गायीच्या आणि म्हशीच्या दूध दरात प्रति लिटर दोन रुपयांनी वाढ करण्यात येणार आहे. दूध उत्पादक आणि प्रक्रिया कल्याणकारी संघाच्या सभासदांची बैठक पुण्यात कात्रज डेअरीमध्ये घेण्यात आली. त्यामध्ये एकमताने हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार गायीच्या दुधाची विक्री आता 56 वरून 58 रुपये प्रतिलिटर, तर म्हशीच्या दुधाची विक्री 72 वरून 74 प्रतिलिटर रुपये होणार आहे, अशी माहिती दूध उत्पादक आणि प्रक्रिया कल्याणकारी संघाचे अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांनी काल पुण्यात दिली.

**हर्षवर्धन पाटील**

इंदापूर तालुक्यातील नीरा भिमा सहकारी साखर कारखान्याच्या 2025-26 ते 2030-31 या कालावधीच्या निवडणुकीमध्ये कारखान्याचे संस्थापक आणि राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांचं निर्विवाद वर्चस्व राहिलं आहे. सलग पाचव्या पंचवार्षिक निवडणुकीत म्हणजे कारखान्याच्या स्थापनेपासूनच्या 25 वर्षात सर्व निवडणुका बिनविरोध झाल्या आहेत.

**फास्टॅग**

राज्यातल्या प्रत्येक पथकर नाक्यावर फास्टॅगचा वापर अनिवार्य करणं आणि रोख पैसे दिल्यास दुप्पट शुल्क आकारणं हा राज्य सरकारचा धोरणात्मक निर्णय असल्याचा निर्वाळा काल मुंबई उच्च न्यायालयाने दिला. त्यामुळे या निर्णयात हस्तक्षेप करणार नसल्याचं म्हणत न्यायालयाने फास्टॅग सक्तीच्या निर्णयाला आव्हान देणारी जनहित याचिका फेटाळली आहे.

**रंगयात्रा**

पुणे महापालिकेच्या अमृतमहोत्सवानिमित्त सांस्कृतिक केंद्र विभागाच्या वतीनं नाट्यगृह  आणि सांस्कृतिक केंद्रांमधील ऑनलाइन आरक्षणासाठी 'रंगयात्रा हे मोबाइल अंप्लिकेशन तयार करण्यात आलं आहे. त्यामुळे सर्व नाट्यगृहाचं  ऑनलाइन बुकिंग, उपलब्ध तारखा, आसनक्षमता यांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

**हवामान**

येत्या 24 तासांत विदर्भात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे, राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**